**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/ १९१५७५२ /२०२५ पिंपरी-चिंचवड दिनांक- ११/०३/२०२५

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

देहुगाव या ठिकाणी दिनांक १६/०३/२०२५ रोजी संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज बीज उत्सव साजरा होत आहे. बीजनिमीत्त संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज मंदीर येथे मोठ्या प्रमाणावर वारकरी सांप्रदायातील भाविक, वारकरी,सामन्य नागरिक हे दर्शनासाठी येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविक हे मोठ्या संख्येने आप-आपली वाहने घेवुन कुटूंबासह देहुगाव येथे येत असतात.त्यामुळे देहूगाव परिसरात वाहतूक कोंडी होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उपायूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### तळवडे, महाळुंगे, चाकण वाहतुक विभाग अंतर्गत

१) देहुगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या सर्व वाहनासाठी रस्ता बंद राहील.(सार्वजनिक वाहतुक बसेस व दिंडीतील वाहने वगळून )

२) महिंद्रा सर्कलकडुन फिजुत्सु कॉर्नर अथवा कॅनबे चौक/आयटी पार्क चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:-** सदर मार्गावरील वाहने महिंद्रा सर्कल → निघोजे → मोईफाटा → डायमंड चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) तळेगाव-चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहुगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदर मार्गावरील वाहने एच.पी.चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

४) देहु कमान → १४ टाळकरी कमान → इंद्रायणी पुल → हॉटेल कॉर्नर दरम्यानचा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद करण्यात येत आहे.

५) १४ टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

६) खंडेलवाल चौक ते देहुकमान (मुख्य) ते परंडवाल चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद.

७) जुना पालखी मार्ग (कंद पाटील चौक) ते झेंडे मळा (जकातनाका) जाणारी वाहतुक वन-वे (एकदिशा मार्ग) करण्यांत येत असून झेडे मळ्याकडून कंद पाटील चौकाकडे जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

### पार्किंग व्यवस्था :-

१. आळंदी-तळवडे कडुन येणाऱ्या वाहनांसाठी माऊली वजन काटा, काळोखे पाटील चौक येथील श्री चव्हाण यांचे पार्किंग व गायरान पार्किंग देहू येथे पार्किंगची सोय करण्यात आलेली आहे.

२. गायरान पार्किंग देहू येथे पीएमपीएल बस स्टॉप करण्यात येत आहे.

३. देहू कमान देहूरोउ ते देहूगावकडे येणाऱ्या वाहनांसाठी राधाकृष्ण लॉन्सच्या शेजारील सीओडीच्या जागेत वाहनांचे पार्किंगची सोय करण्यात आलेली आहे.

४. चाकण-तळेगांव रोडवरील देहुफाटा येथून देहुगांवकडे येणाऱ्या वाहनांसाठी सप्तपदी लॉन्स, येलवडी शॉपिंग कॉम्प्लेक्स, दिगंबरा डेव्हलपर्स व भगिरथी लॉन्स येथे वाहनांकरीता पार्किंगची सोय करण्यात आलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

तसेच साईराज चौक ते देहूफाटा या दरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या हॉटेल शॉपिंग कॉम्प्लेक्स यांच्या जागेत वाहने पार्क करतील.

तरी वरील वाहतुक बदल हा दिनांक १५/०३/२०२५ रोजी ००.०१ वाजेपासून ते दिनांक १७/०३/२०२५ रोजी १६.०० वाजे पर्यंत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत **(अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन)** सर्व प्रकारचे वाहनांचे वाहतुकीसाठी बंद राहतील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा तसेच देहूगाव परिसरात रहिवाशी वस्ती वाढल्याने पार्किंग व्यवस्थेच्या अभावी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेमार्फतीने करण्यात येत आहे.

११/०३/२०२५

**(बापू बांगर)**
पोलीस उपायुक्त
वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

**प्रति,**
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी तळवडे वाहतुक विभाग

/- सदर वाहतूक बदलाचे अनुषंगाने योग्य तो बंदोबस्त लावण्यात येवून वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक ठिकठिकाणी लावण्यात यावेत.

Scanned with OKEN Scanner